# ई- निविदा सूचना

## सूचना क्र.१९/२०२६-२७

### ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

### जिल्हा परिषद, रत्नागिरी

कार्यकारी अभियंता, **ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**, जिल्हा परिषद रत्नागिरी कडील खालील कामांची ई निविदा योग्य त्या वर्गातील **जिल्हा परिषद कडील /एमजीपी नोंदणीकृत** कंत्राटदारांकडून मागविणेत येत आहेत. सदर ई निविदेबाबतची तपशीलवार माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | लेखाशिर्ष | अंदाजीत रक्कम | निविदा रक्कम | इसारा रक्कम | को-या निविदा पत्रकाची किंमत | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | ई-निविदा डाऊन लोड करणेचा कालावधी दिनांक व वेळ | ई निविदा सादर करणेचा कालावधी तारीख व वेळ | ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणेची तारीख व वेळ | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **खुली निविदा** | | | | | | | | | | |
| १ | मौजे उंबर्ले येथे बंधारा बांधणे. ता. दापोली | जलयुक्त शिवार कार्यक्रम २.० | ३९९५५३९/- | ३३६२९१२/- | ३९९५५/- | १०००/- नापरतावा | वर्ग-५ | दि.१९.०५.२०२६ १०.०० ते दि.२६.०५.२०२६ १७.०० | दि.१९.०५.२०२६ १०.०० ते दि.२६.०५.२०२६ १७.०० | दि.२८.०५.२०२६ १०.०० वा. | ३ महिने |
| २ | मौजे विरसई येथे बंधारा बांधणे. ता. दापोली | जलयुक्त शिवार कार्यक्रम २.० | ३५४७३७३/- | २९८५७०५/- | ३५४७३/- | १०००/- नापरतावा | वर्ग-५ | दि.१९.०५.२०२६ १०.०० ते दि.२६.०५.२०२६ १७.०० | दि.१९.०५.२०२६ १०.०० ते दि.२६.०५.२०२६ १७.०० | दि.२८.०५.२०२६ १०.०० वा. | ३ महिने |

# निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) संपूर्ण ई निविदा प्रक्रिया ऑनलाईन स्वरूपाची असेल, निविदेसंदर्भातील सूचना, प्रसिध्दी, शुध्दीपत्रके इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

२) वरील कामांची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे ई निविदा उपरोक्त दिनांका पर्यंत अधिग्रहित (download) करता येतील.

३) वरील कामांची निविदा या संकेतस्थळावर उपरोक्त दिनांकापर्यंत फक्त इलेक्ट्रॉनिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन स्वरूपात सादर करावी.

४) ई निविदेसोबत तांत्रिक लखोटयामध्ये जोडावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे रहातील (अधिक माहिती करीता इंग्रजी निविदा सूचना व बी वन निविदा पहावी).

अ) Registration and Qualification Documents :- यात मक्तेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय असणे आवश्यक आहे.
जीएसटी नोंदणी दाखला, GSTR-३ B दाखला मार्च-२०२५ अथवा त्यापुढील, पॅन कार्ड, आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ अथवा २०२४-२५ चे आयकर विवरणपत्र असणे आवश्यक आहे. व्यवसाय कर दाखला व व्यवसाय कर भरणा केलेले अद्ययावत चलन, मक्तेदाराचे डिक्लेरेशन, १ ते ४ स्टेटमेंन्ट असणे आवश्यक आहे.
जिल्हा परिषदेकडील कामांचे अथवा जलसंधारण कडील कामांचे काम पुर्णत्वाचे दाखले जोडणे आवश्यक आहे.
आहे. निविदा फॉर्म फी भरणा त्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) निविदाकाराने त्यांच्या स्वत:च्या फर्मच्या नावे असलेल्या बँकेच्या खाते क्रमांकावरुन Internet banking द्वारा निविदा फॉर्म फीची रक्कम व इसारा रक्कम वर्ग करणे बंधनकारक आहे. तसे न आढळल्यास निविदा नाकारण्यात येईल.

६) निविदाकाराने कार्यालयाकडून अपलोड केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले आहे व त्या मधील सर्व अटीशर्ती निविदाकारास मान्य आहे असे समजून त्याने निविदा सादर केलेली आहे असे समजण्यात येईल.

७) निविदा सादरीकरण/स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करणेत येतील.डी.डी.स्कॅन करुन अपलोड करणे व त्याची प्रत ही कार्यालयात सादर करणे पध्दत बंद करण्यात आलेली आहे याची निविदाकारांनी नोंद घ्यावी. निविदाद्वारे कोणतेही मूळ कागदपत्रे प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. तथापि न्युनतम देकार) निविदाकाराला Financial Bid Opening नंतर निविदा स्विकृतीपूर्वी सर्व Upload केलेली कागदपत्रे मूळ कागदपत्रांबरोबर सहाय्यक लेखाधिकारी ग्रापापु विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे कडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील तसेच Bid Submission Confirmation receipt/Payment Transaction Receipt ची छायांकित प्रत upload करणे बंधनकारक राहील.

८) दि.१.०७.२०१७ पासून जीएसटी करप्रणाली शासनाने लागू केलेली असल्याने मक्तेदाराने दरपत्रक भरताना जीएसटीचा विचार करूनच दरपत्रक भरावे. व सदरची निविदा जीएसटी शिवाय प्रसिध्द करण्यात आली आहे.

९) निविदे सोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबत शपथपत्र रक्कम रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपवरसोबत दिलेल्या विहीत नमुन्यात सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit) मा.कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी करुन कामनिहाय स्वंतत्र अपलोड करणे बंधनकारक राहील. स्टॅम्प पेपरवरील सत्यप्रतिज्ञापत्राची मुळ प्रत करारनाम्यासोबत जमा करणे बंधनकारक राहील.

१०) शासन निर्णय दिनांक ५/१०/२०१८ अन्वये कार्यारंभ प्राप्त होताच कामाचा विमा शासकिय विमा निधी कार्यालयाकडे काढणे अनिवार्य आहे.

११) योजनेच्या प्रशासकिय मान्यतेच्या अटी व शर्ती लागू राहतील.

१२) मक्तेदार काळया यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

१३) निविदा प्रक्रिये मध्ये मक्तेदार यांच्या काही हरकती असल्यास निविदा (तांत्रिक लखोटा) ओपन केल्यावर दोन दिवसात घेण्यात यावी त्यानंतर कुठल्याही प्रकारचा विचार केला जाणार नाही यांची संबधित मक्तेदार यांनी नोंद घ्यावी.

१४) निविदाकाराचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १.१ % पासून ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १ % एवढया रक्कमेचा देय असलेला धनाकर्ष कार्यकारी अभियंता ग्रापापु जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे नावे अथवा मुदत ठेव पावती निविदा प्रसिध्दिच्या दिनांकानंतरच्या तारखेचा जो लघुत्तम निविदा धारक असेल त्याने निविदा आर्थिक लिफाफा उघडलेपासून आठ दिवसाच्या आत कार्यालयामध्ये जमा करावा अथवा रोख चलनाने भरणा करावा.

१५) **विहीरीचे /बंधाऱ्याचे काम करताना बक्षीस पत्र / संमती पत्र प्राप्त करून घेऊनच काम सुरू करावे. अन्यथा तक्रारी किंवा न्यायालयीन बाब उद्भवल्यास त्याची जबाबदारी संबंधित उपअभियंता ग्रापापु उपविभाग यांची राहील.**

१६) **मृद व जलसंधारण विभागाच्या जलयुक्त शिवार २.० लेखाशिर्षाखाली निधी शासन स्तरावर उपलब्ध होण्याच्या अटीस अधिन राहून सदर निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. याची निविदाकाराने नोंद घेण्यात यावी.**

१७) **वरील यादीतील कामे तालुकास्तरीय तसेच गाव आराखड्यात समाविष्ट असल्याची खात्री करून संबंधित विभागाने पुढील आवश्यक कार्यवाही करावी.**

१८) **कामाचा दोष निवारण कालावधी ५ वर्ष राहील.**

१९) **MIS पोअर्लवर नोंदविलेल्या कामांचे Unique ID Generate करावेत व प्राप्त Unique ID व्दारे काम सुरू होण्यापुर्वी, काम सुरू झाल्याचे / काम प्रगतीत असतानांचे व काम पुर्ण झालेल्या कामाचे जिओ टॅगिंग (अक्षांश रेखांश) करून फोटो मोबाईल ॲपव्दारे अपलोड करण्यात यावे**

२०) **कुठलेही कारण न दर्शविता ऑनलाईन निविदा स्विकारणेचा व नाकारणेचा अधिकार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद रत्नागिरी राखून ठेवत आहे.**

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

जा.क्र.रजिप/ग्रापापु/टेंडर/खुली निविदा/ /२०२६
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जि.प.रत्नागिरी, दि :- १६.०५.२०२६**

प्रत :- कार्यालयीन सुचना फलकावर माहितीसाठी

प्रत :- महाराष्ट्रशासनाच्या http//:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Upload करणेसाठी

Signature Not Verified

Digitally signed by MAYURI AJIT PATIL
Date: 2026.05.19 15:29:29 IST
Location: Maharashtra-MH